# जिल्हाधिकारी कार्यालय,अकोला

## जिल्हा सेतू सोसायटी अंतर्गत कंत्राटी पदभरती-2017

## जाहिरात क्रमांक/अका/सेतू/कावि- 3089 -/2017,दिनांक 21/08/2017

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा सेतू समिती,अकोला यांचे मार्फत एकात्मीक बाल संरक्षण योजनेंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्षाकरिता संपुर्णतः तात्पुरत्या स्वरुपातील सेवाअनुबंधानुसार(कंत्राटी पध्दतीने) एकत्रिक मानधनावर कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी उमेदवारांची निवड करण्याकरिता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

जाहिरातीमध्ये नमुद पदांसाठी आवश्यक अर्हता पात्रता नसलेल्या उमेदवारांनी अर्ज सादर करु नयेत.

### पदभरती कार्यक्रम.

| अ.क्र | कालबध्द कार्यक्रमानुसार करावयाची कार्यवाही | कालावधी दिनांक पासून पर्यंत |
|---|---|---|
| 1 | जाहिरात प्रसिध्द करणे | 23/08/2017 |
| 2 | अर्ज स्विकारण्याचा कालावधी | 24/08/2017 ते 04/09/2017 |
| 3 | पात्र/अपात्रते बाबत यादी प्रसिध्द करणे | 06/09/2017 |
| 4 | लेखी परिक्षा / सरळमुलाखती बाबत सुचना प्रसिध्द करणे | 08/09/2017 |

**टिप: सदर कंत्राटी पदभरती प्रक्रीये बाबत सर्व सुचना या कार्यालयाचे संकेतस्थळ www.akola.nic.in वर वेळो-वेळी प्रसिध्द करण्यात येईल. पदभरतीबाबत कुठलाही पत्र व्यवहार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.**

## पदांचा तपशिल.

| अ.क्र. | पदांचे नांव | पद संख्या | मानधन | पात्रतामानधन व संख्या पद | आवश्यक कौशल्य |
|---|---|---|---|---|---|
| 1. | **संरक्षण अधिकारी संस्थात्मक(काळजी) Protection officer - Institutional Care)** | 01 | 12,000/- मासिक | 1. समाजकार्य,मानसशास्त्र, समाजशास्त्र किंवा इतर संबधित विषयांमध्ये पदवीधर<br>२. **संगणकाचे समुपदेशनाचे ज्ञान आवश्यक**.<br>3.बाल कल्याण क्षेत्रात अनुभव असल्यास प्राधान्य .<br>4.संबंधित विषयात 3 वर्षाचा अनुभव. | 1. सरकारी यंत्रणे सोबत काम करण्याचा अनुभव.<br>2. एम.एस ऑफीसवर काम करण्याचे कौशल्य. |
| 2. | **समुपदेशक ( Counselor )** | 01 | 8,000/- मासिक | 1.मानसशास्त्र विषयात पदवी. (बाल मानसशास्त्र विषयात असल्यास प्राधान्य).<br>2. बालकल्याण क्षेत्रात कमीत कमी 01 (एक) वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | 1.समुपदेशन कौशल्य असावे.<br>2.समुपदेशनाचे अहवाल लिहीण्याचे कौशल्य.<br>3.बालकांच्या विविध स्टेकहोल्डर सोबत काम करण्याचे कौशल्य. 4.गटात काम करण्याचे कौशल्य. |

| अ.क्र. | पदांचे नांव | पद संख्या | मानधन | पात्रतामानधन व संख्या पद | आवश्यक कौशल्य |
|---|---|---|---|---|---|
| 3 | सामाजिक कार्यकर्ता (Social Worker) | 01 | 8,000/- मासिक | 1.समाजकार्य विषयात पदवी (बाल मानसशास्त्र विषयात असल्यास प्राधान्य)<br>2.बालकल्याण क्षेत्रात कमीत कमी 1 (एक) वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य | 1.सरकारी यंत्रणेसोबत काम करण्याचा अनुभव.<br>2.इंग्रजी,हिंदी व मराठी भाषेवर प्रभुत्व.<br>3.कार्यक्षेत्रातल्या विविध स्टेक होल्डर सोबत काम करण्याचे कौशल्य.<br>4.एम.एस.ऑफिस वर काम करण्याचे कौशल्य. |
| 4 | माहिती विश्लेषण (Data Analyst) | 01 | 8,000/- मासिक | 1. समाजकार्य,मानसशास्त्र, समाजशास्त्र विषयांत पदवी<br>2. संगणकाची व समुपदेशनाचे माहिती असावी.<br>3.बाल कल्याण क्षेत्रात कमीत कमी 2(दोन) वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य. | 1.माहिती भरण्याचे व विश्लेष्णाचे कौशल्य<br>2. माहितीचा अहवाल व रजीस्टर सांभाळण्याची क्षमता. |
| 5 | आऊटरिच कार्यकर्ता (Outreach Worker) | 02 | 4,000/- मासिक | 1. बारावी (HSC) किंवा मान्यताप्राप्त तत्सम पात्रता.<br>2.संगणकावर काम करण्याचा अनुभव संवाद कौशल्य.<br>3.संबंधित क्षेत्रात काम करण्याचा अनुभव<br>4.समाजकार्यात डिप्लोमा किंवा Certificate असल्यास प्राधान्य.<br>5.संबधित अकोला जिल्हयाचे असावे. | 1.बालकांच्या मुद्यावर संवेदनशीलता.<br>2.व्यक्ती,गटा व समुदाया-सोबत काम करण्याचे कौशल्य<br>3.गटाचे सदस्य म्हणुन काम करण्याचे कौशल्य. |

## अर्ज सादर करण्याबाबत आवश्यक सुचना.

1 उमेदवारांना जाहीरातीमध्ये नमुद पदाकरीता विहीत केलेल्या Online अर्ज www.akola.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. सदर अर्जाचे सर्व रकान्यात अचुक माहिती भरुन स्वतःचा फोटो व त्याखाली स्वतःची स्वाक्षरी अपलोड करुनच Online अर्ज सादर करावयाचे आहे.

2 मुदतीनंदर ऑनलाईन भरलेले अर्ज व चलान स्विकारली जाणार नाही. Online व्यतीरिक्त अन्य मार्गाने अर्ज स्विकारल्या जाणार नाही.

3 संकेतस्थळावर ऑनलईन भरलेल्या अर्जाची व चलानची प्रिंटआऊट न चुकता काढून ठेवावी. तसेच ऑनलाईन सादर केलेल्या अर्जाची प्रिंट व मुळ चलानची प्रत नमुद केलेल्या कागदपत्रासह पडताळणीचे वेळी सादर करणे बंधनकारकर राहील.

## लेखी परिक्षेचे स्वरुप.

ऑनलाईन प्राप्त अर्जाचे संख्ये नुसार उमेदवारांची लेखी परिक्षाघ्यावी की सरळमुलाखती करिता बोलवावे याबाबत संपुर्ण अधिकार मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हा सेतू समिती यांनी राखुन ठेवलेला आहे. लेखी परिक्षा अथवा प्रत्यक्ष मुलाखतीबाबत आवश्यक त्या सर्व सुचना या कार्यालयाचे संकेतस्थळावर www.akola.nic.in येथे प्रसिध्द करण्यात येईल. पदभरती प्रक्रीयेबाबत टपालव्दारे संपर्क साधला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

## परिक्षा शुल्कबाबत सुचना.

1. परिक्षा शुल्क सरसकट रु. 300/-(अक्षरी रु.तीनशे फक्त) राहील परिक्षा शुल्क अर्जासोबत भरावयाचे आहे. सदर परिक्षा शुल्क बँक चलान च्या स्वरुपात जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती,अकोला यांचे नावे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कुठल्याही शाखेत चलानव्दारे खाते क्रमांक- **36017366959** जमा करणे अनिवार्य आहे. सदर परिक्षा शुल्क ना परतावा राहील कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही यांची नोंद घ्यावी.
2. प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र परिक्षा शुल्क भरणे अनिवार्य आहे.

## अटि व शर्ती.

1. या जाहीराती व्दारे सर्व पदे ही सेवाअनुबंध (कंत्राटी) स्वरुपाची असून सेतू समिती अंतर्गत राबविण्यात येत असल्याने सदर पदे ही संपुर्णतः तात्पुरत्या स्वरुपाची राहतील. व सदर पदांना शासन आस्थापनेचे कुठलेही निकष राहणार नाहीत.
2. सदर कंत्राटी पदांचा कालावधी 11 महिने अथवा सदर काम पुर्ण होईल. या पैकी जो कालावधी कमी राहील तो पावेतो राहील.
3. उच्चतम अर्हता व अनुभव धारण करित असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.
4. वरिल पदांकरिता उमेदावाराचे वय 18 वर्षापेक्षा कमी व 45 वर्षापेक्षा अधिक नसावे.
5. वरिल पदांकरिता लेखी परिक्षा अथवा थेट मुलाखती संबंधित सुचना जिल्हयाचे संकेतस्थळावर www.akola.nic.in वर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत संबंधित उमेदवार यांना स्वतंत्रपणे पत्रव्यवहार केला जाणार नाही.
6. निवड झालेल्या उमेदवारांनी कामाचे स्वरुप काम न केल्यास कोणतेही कारण न देता कामावरुन कमी करण्याचे संपुर्ण अधिकारी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती,अकोला यांना राहतील.
7. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती पश्चात नियमीत आस्थापनेवरील शासकीय कर्मचाऱ्यास अनुज्ञेय असणारे लाभ/भत्ते व तद्नुषंगीक बाबी लागु राहणार नाहीत.
8. निवड झालेल्या व नियुक्ती दिलेल्या उमेदवारास कामावर रुजु होण्यापुर्वी रु. 100/- च्या स्टॅम्प पेपरवर अटि व शर्तीबाबत हमीपत्र या कार्यालयास सादर करणे अनिवार्य राहील.
9. नियुक्ती पश्चात रुजु झालेल्या उमेदवारांना सदर काम सोडावयाचे झाल्यास या कार्यालयास 30(तीस) दिवस अगोदर सुचना देणे अनिवार्य राहील अन्यथा त्यांचे एक महिन्याचे मानधन कपात करण्यात येईल.
10. परिक्षा/थेटमुलाखती अथवा पदभरतीबाबत वेळापत्रकात बदलकरणे व तद्नुषंगीक बाबीत बदल करण्याबाबतचे सर्व अधिकार मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा सेतू समिती यांनी राखुन ठेवलेले आहेत.

**दिनांक : 21 ऑगस्ट,2017**

**(आस्तिक कुमार पाण्डेय,भाप्रसे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा सेतू समिती,अकोला.**